


दैनिक **अक्षराज** अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध    Email : newsaksharaj2021@gmail.com

खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला
फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स
एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here

वर्ष : ०५ | अंक : २५५, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, सोमवार, दि.२७ एप्रिल २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

## पाण्यावरचा खेळ थांबवा; माथेरानकरांच्या सहनशीलतेची परीक्षा घेऊ नका



**अक्षराज : चंद्रकात सुतार**

**दि.२६, माथेरान :** माथेरानमध्ये सुरू असलेला पाणीपुरवठ्याचा कारभार हा केवळ ढिसाळ नाही, तर तो नागरिकांच्या आयुष्याशी उघडपणे खेळ करणारा आहे. ही परिस्थिती अपघाताने निर्माण झालेली नाही; ती नियोजनशून्यता, निष्काळजीपणा आणि जबाबदारी झटकण्याच्या सवयीची थेट फलश्रुती आहे. प्रश्न असा आहे की, प्रशासनाला खरोखरच या शहराची काळजी आहे का, की सर्व काही चालू दे या वृत्तीवर सोडले आहे?पाणीपुरवठ्यासारख्या जीवनावश्यक व्यवस्थेत कायमस्वरूपी अधिकारी नाहीत, तांत्रिक कर्मचारी नाहीत, आणि जे आहेत ते ठेकेदार पद्धतीवर हे कोणते शासन? फिल्टर प्लांटवर योग्य देखरेख नाही, पाण्यात किती रसायन टाकायचे याचे भान नाही, आणि नमुने तपासणीची प्रक्रिया केवळ दिखाऊपणासाठी! हा प्रकार म्हणजे थेट नागरिकांच्या आरोग्याशी जुगार खेळण्यासारखा आहे.

उद्या एखादी साथरोगाची परिस्थिती निर्माण झाली, तर जबाबदार कोण?याहून गंभीर म्हणजे पाण्याच्या स्रोतांचे नियोजन पूर्णपणे कोलमडले आहे. शार्लोट लेकसारखा महत्त्वाचा साठा एप्रिलमध्येच आटत चालला आहे. जो साठा मे-जूनसाठी राखून ठेवायचा, तो आधीच संपवला गेला. हे केवळ चूक नाही, तर अक्षम्य दुर्लक्ष आहे. पावसावर अवलंबून आहोत हे कारण देणे म्हणजे अपयश झाकण्याचा स्वस्त प्रयत्न आहे.नेरळहून येणाऱ्या पाण्यावरही योग्य नियंत्रण नाही. उलट, अनधिकृत जोडण्या देऊन माथेरानकरांवर आर्थिक भार टाकला जात आहे. म्हणजे पाणी कमी आणि बिल जास्तही कोणती न्यायव्यवस्था? नागरिकांनी पाणी वाचवायचे, कर भरायचे, आणि बदल्यात मिळणार कायअव्यवस्था आणि असुरक्षितता?प्रशासनाच्या या निष्क्रियतेला जितके दोष द्यायचे, तितकेच नागरिकांनीही आत्मपरीक्षण करणे गरजेचे आहे.

प्रत्येक वेळी समस्या वाढल्यानंतरच आवाज उठवायचा, आणि नंतर पुन्हा शांत बसायचेही सवय बदलली पाहिजे. हक्कासाठी संघटितपणे उभे राहणे, प्रश्न विचारणे आणि उत्तरांची मागणी करणे हीच खरी लोकशाही आहे.आता वेळ आली आहे पुरे झाले म्हणण्याची. पाणी हा हक्क आहे, उपकार नाही. नियोजन, जबाबदारी आणि पारदर्शकता यांची स्पष्ट मागणी झाली पाहिजे. अन्यथा, आजची पाणीटंचाई उद्याचा गंभीर जलसंकट बनायला वेळ लागणार नाही. माथेरानकरांनी जागे होऊन प्रशासनाला जाब विचारला नाही, तर या निष्काळजी व्यवस्थेचा फटका प्रत्येक घराला बसणारआणि तेव्हा पश्चात्ताप करण्याशिवाय काहीच उरणार नाही.

## अमराठी रिक्षा चालकांच्या आंदोलना विरोधात कल्याण डोंबिवलीत मनसे आक्रमक




**अक्षराज : संजय पंडित**

**दि.२६, डोंबिवली (ठाणे) :** राज्य सरकारने राज्यातील मराठी रिक्षा आणि टॅक्सी चालकांसाठी मराठी भाषेत संभाषण करणं अनिवार्य केलं आहे. रिक्षा चालक आणि टॅक्सी चालकांना मराठी बोलता आली नाही तर त्यांचा थेट परवाना रद्द करण्याची कारवाई होणार आहे. राज्य सरकारच्या या निर्णयाविरोधात अमराठी रिक्षा आणि टॅक्सी चालक हे आक्रमक झाले आहेत. जवळपास १५ लाख रिक्षा आणि टॅक्सी चालक हे ४ मे पासून या मराठी सक्तीच्या निर्णया विरोधात संपावर जाण्याच्या तयारीत आहेत.दरम्यान अमराठी रिक्षावाल्यांच्या या आंदोलना विरोधात राज ठाकरे यांच्या महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने पुन्हा एकदा आक्रमक होत मराठीचा मुद्दा ऐरणीवर घेऊन दंड थोपटले आहेत.कल्याण-डोंबिवलीत मनसैनिकांनी 'मराठी ओळख' या मोहिमे अंतर्गतमराठी बोला, महाराष्ट्रात रहा ! अशा प्रकारचा रिक्षांवरून दमदार इशारा देण्यात येत आहे.रिक्षांवर मी मराठी बोलतो, मला मराठी समजते, या माझ्या रिक्षात बसा अशा आशयाचे स्टिकर लावण्याची मोहीम देखील सुरू केली आहे.

आगामी ४ मे रोजी मराठी शक्ती विरोधात आंदोलन करणाऱ्यांना आपल्या खास मनसे स्टाईलने उत्तर देण्याचा इशारा देण्यासाठी ही मोहीम राबवण्यात येत आहे.मनसे पदाधिकाऱ्यांनी शहरातील विविध भागात जाऊन रिक्षाचालकांना स्टिकर वाटप करत ते रिक्षांवर लावण्याचे आवाहन केले आहे. या मोहिमेला रिक्षाचालकांचा चांगला प्रतिसाद मिळत असून अनेकांनी स्वयंस्फूर्तीने स्टिकर लावले आहेत. विशेष म्हणजे परप्रांतीय रिक्षाचालकांनीही या उपक्रमात सहभागी होत मराठी भाषेचा सन्मान राखणार असल्याचा संदेश यावेळी दिला आहे.यावेळी मनसेचे उपजिल्हाध्यक्ष योगेश पाटील,शहर संघटक तकदिर काळण आणि पदाधिकारी आरिफ शेख यांनी पुढाकार घेत रिक्षाचालकांशी संवाद साधला आहे. महाराष्ट्रात व्यवसाय करायचा असेल तर मराठी भाषा येणे आणि तिचा आदर करणे आवश्यक आहे, असे स्पष्ट करत त्यांनी सर्व चालकांना मराठीत संवाद साधण्याचे आवाहन केले आहे.मनसेच्या या मोहिमेमुळे शहरात पुन्हा एकदा मराठी अस्मितेचा मुद्दा चर्चेत आला असून, आगामी आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर राजकीय वातावरण तापण्याची चिन्हे दिसत आहेत. रिक्षांवरील हे स्टिकर केवळ ओळख नसून मराठीच्या सन्माना साठीचा ठाम संदेश असल्याची भावना मनसे कार्यकर्त्यांकडून व्यक्त केली जात आहे.

## लालपरीचा प्रवास अधिक सुखकर होणार! १ मेपासून 'आपली बस, आपली सेवा' उपक्रम



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२६, मुंबई :** राज्याच्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग असलेली एसटी सेवा अधिक प्रवासी-केंद्रित करण्यासाठी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने आपली बस, आपली सेवा हे अभियान जाहीर केले आहे. १ मेपासून राज्यभर राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमाची माहिती परिवहन मंत्री आणि एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.

मंत्री सरनाईक यांनी दिलेल्या माहितीनुसार, बस ताफ्यात वाढ होऊनही प्रवासीसंख्या आणि महसूल अपेक्षेप्रमाणे वाढत नाही. या पार्श्वभूमीवर प्रवाशांचा विश्वास पुन्हा मिळवणे आणि सेवेची गुणवत्ता उंचावणे हे या अभियानाचे मुख्य उद्दिष्ट आहे.

**सेवेचा नवा दृष्टिकोन**

या उपक्रमांतर्गत चालक आणि वाहक यांच्या भूमिकेत बदल करण्यात येणार असून, त्यांच्याकडून अधिक जबाबदार आणि प्रवासी-अनुकूल वर्तनाची अपेक्षा ठेवण्यात आली आहे. बसची नियमित स्वच्छता, वेळेचे काटेकोर पालन, गणवेशातील नीटनेटकेपणा आणि शिस्त यावर विशेष भर असेल. प्रत्येक प्रवासाच्या सुरुवातीला चालकाने स्वतःची ओळख करून देत मार्ग, थांबे आणि अपेक्षित वेळ याची माहिती प्रवाशांना देणे अनिवार्य करण्यात आले आहे. यामुळे संवाद वाढून प्रवाशांमध्ये विश्वास निर्माण होईल, अशी अपेक्षा आहे.

**प्रवाशांचीही जबाबदारी**

या अभियानात प्रवाशांचाही सहभाग महत्त्वाचा मानण्यात आला आहे. स्वच्छता राखणे, सामानाची जबाबदारी घेणे आणि प्रवासादरम्यान शिस्त पाळणे, या बाबींमुळे एकूण अनुभव अधिक चांगला होईल.

तसेच डिजिटल सेवांचा वापर वाढवण्यासाठी एनसीएमसी स्मार्ट कार्ड आणि ऑनलाइन आरक्षणाला प्रोत्साहन दिले जाणार आहे.

**अडचणींवर तातडीने तोडगा**

बस रद्द होणे किंवा मार्गात अडथळे निर्माण झाल्यास पर्यायी व्यवस्था त्वरीत उपलब्ध करून देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. बसस्थानके स्वच्छ, सुरक्षित आणि व्यवस्थित ठेवण्यावरही भर देण्यात येणार आहे. यामुळे अधिकाधिक नागरिक एसटी सेवेचा वापर करतील अशी आशा व्यक्त केली जात आहे.

**तक्रार निवारणावर भर**

प्रवाशांच्या तक्रारींचे जलद निराकरण करण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा कार्यान्वित केली जाणार आहे. नियमित आढाव्याद्वारे सेवेतील त्रुटी ओळखून त्यावर तातडीने उपाययोजना केल्या जातील.

**विश्वास पुनर्स्थापनेचा प्रयत्न!**

१ मेपासून महाराष्ट्रात सुरू होणारे हे अभियान केवळ प्रशासकीय बदलांपुरते मर्यादित नसून, एसटी आणि प्रवासी यांच्यातील नातेसंबंध अधिक दृढ करण्याचा प्रयत्न आहे. सेवा अधिक विश्वासार्ह, सुलभ आणि सन्मानजनक करण्याच्या दिशेने हा महत्त्वाचा टप्पा ठरेल, असा विश्वास परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी व्यक्त केला.

## कुणाची तरी जिरवायची होती म्हणून लोकसभा लढविली...

### आता मीच विधानसभेची निवडणूक लढवणार – निलेश लंकेंची घोषणा

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२६, पारनेर (अहिल्यानगर) :** कुणाची तरी जिरवायची होती म्हणून मी लोकसभा निवडणूक लढविली; मात्र आता येणारी विधानसभा निवडणूक मी स्वतः लढणार आहे. असे सांगत पुन्हा एकदा विधानसभेच्या माध्यमातून मुंबईच्या दिशेने प्रवास करण्यात येणार असल्याचे खासदार निलेश लंके यांनी सांगितले.

आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती तसेच ग्रामपंचायत निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर खासदार नीलेश लंके यांनी पारनेर तालुक्याचा झंझावाती दौरा सुरू केला असून, या दौऱ्याच्या माध्यमातून त्यांनी कार्यकर्त्यांना थेट मार्गदर्शन करत निवडणूक रणधुमाळीचा बिगुल फुंकला आहे. पारनेर शहरात फटाक्यांच्या आतषबाजीत आणि घोषणाबाजीत खा. लंके यांचे उत्साहात स्वागत करण्यात आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून दौऱ्याची सुरुवात झाली. त्यानंतर ढवळपुरी व टाकळी ढोकेश्वर गटात बैठका घेऊन कार्यकर्त्यांशी सविस्तर संवाद साधण्यात आला.

यावेळी बोलताना खा. लंके यांनी स्पष्टपणे सांगितले की, कुणाची तरी जिरवायची होती म्हणून मी लोकसभा निवडणूक लढविली; मात्र आता येणारी विधानसभा निवडणूक मी स्वतः लढणार आहे. तसेच, सन २०२९ मध्ये मुंबईत सक्रिय राजकारण करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. कार्यकर्त्यांना संबोधित करताना त्यांनी आक्रमक भूमिका मांडली.

आपल्या कार्याचा आढावा देताना खासदार निलेश लंके यांनी सांगितले की, मतदारसंघात २ हजार कोटी रुपयांची विकासकामे करण्यात आली असून १ लाख ५२ हजार नागरिकांना वैयक्तिक मदत देण्यात आली आहे. तसेच रुग्णालयातील गरजू रुग्णांची दरमहा १५ ते २० लाख रुपयांची बिले माफ करून देण्याचे काम केले जात आहे. मुख्यमंत्री व पंतप्रधान सहायता निधीतून मोठ्या प्रमाणात मदत मिळवून दिल्याचे त्यांनी नमूद केले.



खा.निलेश लंके यांच्या गाव भेट दौऱ्याला उस्फूर्त प्रतिसाद

**संघर्षाची तयारी ठेवा**

ज्या ठिकाणी अन्याय होईल, तिथे संघर्ष करा, धाक निर्माण करा आणि गरज पडल्यास आंदोलन करा. निवडणुका संपल्यानंतर कोणी कोणाला विचारत नाही, त्यामुळे गावोगाव संघटित होऊन जनतेच्या प्रश्नांवर सातत्याने काम करा, असे आवाहन त्यांनी केले.

**कार्यकर्त्यांनी मरगळ झटकावी**

कार्यकर्ता हा रेसच्या घोड्यासारखा असला पाहिजे. मी आजही २०-२० तास समाजकार्य करतो असे सांगत त्यांनी कार्यकर्त्यांना अधिक जोमाने कामाला लागण्याचे निर्देश दिले.

आगामी निवडणुकांसाठी लक्ष्य निश्चित करताना त्यांनी जिल्हा परिषद, पंचायत समिती तसेच किमान ८५ ग्राम पंचायती ताब्यात घेण्याचा निर्धार व्यक्त केला. त्यासाठी बूथ स्तरावर संघटन मजबूत करण्यावर विशेष भर देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. विधानसभा निवडणुकीनंतर आलेल्या मरगळीकडे लक्ष वेधत ते म्हणाले झाले गेले गंगेला मिळाले नकारात्मक विचार सोडून सकारात्मकतेने कामाला लागा. मी तुमच्या पाठीशी खंबीरपणे उभा आहे.

## रामाळा तलावातील माशांचा मृत्यू म्हणजे ३० कोटींच्या निधीचा बळी !

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२६, चंद्रपूर :** चंद्रपूर शहराचे ऐतिहासिक भूषण असलेल्या रामाळा तलावात सध्या हजारो माशांचा जो सामूहिक मृत्यू झाला आहे, तो केवळ तांत्रिक बिघाड नसून, प्रशासकीय यंत्रणेचा अक्षम्य निष्काळजीपणा आहे, अशी संतप्त प्रतिक्रिया खा. प्रतिभा धानोरकर यांनी व्यक्त केली आहे.

केंद्र पुरस्कृत 'अमृत २.०' अभियानाअंतर्गत या तलावाच्या पुनरुज्जीवनासाठी तब्बल ३० कोटी रुपयांचा निधी मंजूर असूनही तलावाची ही भीषण दुर्दशा होणे अत्यंत क्लेशदायक आहे. माशांचा तडफडून झालेला मृत्यू आणि परिसरात पसरलेली दुर्गंधी यामुळे प्रशासकीय दाव्यांचे पूर्णत: वाभाडे निघाले असून, या घटनेमुळे शहराच्या ऐतिहासिक वारशाला मोठा तडा गेला असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

या प्रकल्पाअंतर्गत सावरकर नगर परिसरातील सांडपाणी प्रक्रिया केंद्राचे काम ९० टक्के आणि संरक्षक भिंतीचे काम ८० टक्के पूर्ण झाल्याचे प्रशासन सांगत असले तरी प्रत्यक्षात तलावात दूषित पाणी मिसळणे अद्याप सुरुच आहे. तलावातील पाणी शुध्द करण्यासाठी ' ऑक्सिडेशन' आणि ' वायुवीजन' यंत्रणा केवळ कागदोपत्रीच राबविली जात असल्याचा दाट संशय खासदार प्रतिभा धानोरकर यांनी व्यक्त केला आहे. प्रत्यक्ष जमिनीवर प्राणवायुच्या अभावामुळे मोठ्या प्रमाणावर माशांचा बळी गेला असून, या तांत्रिक विसंगतीची आणि निधीच्या वापराची सखोल चौकशी होणे आता अनिवार्य झाले आहे, असेही त्यांनी ठणकावून सांगितले.



तलावातील कचरा आणि जलपर्णी साफ करण्यासाठी अत्याधुनिक यंत्रे उपलब्ध असतानाही रामाळा तलावाची ही स्थिती का? असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे. १८ मे २०२४ पासून सुरु झालेल्या या कामाची मुदत संपत आली असतानाही प्रकल्प पूर्णत्वाऐवजी जलचरांच्या विनाशाकडे झुकत असल्याचे भीषण वास्तव समोर आले आहे. ३० कोटी रुपये खर्च होऊनही जर तलाव प्रदुषणमुक्त होत नसेल, तर या अवाढव्य निधीचा विनियोग नेमका कुठे झाला ? हा एक गंभीर प्रश्न असून या संपूर्ण प्रकरणाचे ' न्यायवैद्यक अंकेक्षण' करण्याची मागणी खासदार प्रतिभा धानोरकर यांनी जिल्हा प्रशासनाकडे केली आहे. जिल्हा प्रशासनाने या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन तातडीने उच्चस्तरीय चौकशी समिती नेमावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. तलावातील मृत मासे युध्दपातळीवर काढून परिसराचे तात्काळ निर्जंतुकीकरण करावे आणि या विनाशाला जबाबदार असणाऱ्या कंत्राटदारासह संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर फौजदारी कारवाई करण्यात यावी.

जर प्रशासनाने या प्रकरणाची तात्काळ दखल घेऊन दोषींना पाठीशी घातल्यास, चंद्रपूरच्या जनतेला सोबत घेऊन तीव्र लोकआंदोलन छेडण्याचा इशारा खासदार प्रतिभा धानोरकर यांनी या प्रसिध्दी पत्रकाद्वारे दिला आहे.




## न्याय नाहीच, कलंक तरी मिटवा!

एकविसाव्या शतकाच्या प्रारंभीच अर्थात २००१ मध्ये झालेली दंगल, त्यानंतर २००६ चे साखळी बॉम्बस्फोट आणि पाठोपाठ २००८च्या स्फोटाने मालेगावनामक मुस्लिमबहुल शहराकडे संपूर्ण देशाचे लक्ष वेधले गेले. तसे त्याआधी शे-सव्वाशे वर्षांत अनेकदा घडलेला हिंदू-मुस्लिम जातीय संघर्ष आणि काही चांगल्या गोष्टींमुळेसुद्धा हे शहर चर्चेत होतेच. मालेगावची ओळख संवेदनशील वा स्फोटक शहर म्हणून निर्माण होण्यामागे आजवर क्षुल्लक कारणांवरून झालेला धार्मिक संघर्षाचा इतिहासच कारणीभूत आहे. १९२१ साली खिलाफत चळवळीच्या निमित्ताने या शहरात २० व्या शतकातील पहिली दंगल झाली. मालेगाववर दंगलींचे शहर हा शिक्का लागला तो १९६७ साली. गोहत्या हे त्या संघर्षाचे कारण ठरले होते. त्यानंतर अगदी २००० च्या दशकांपर्यंत या शहराने दंगली अनुभवल्या. त्यामुळे शहर बदनाम होत गेले, तसे बकालसुद्धा.

प्रत्येक संघर्षाने इथल्या पिढ्यांना कित्येक वर्षे मागे नेले. आजही अठराव्या शतकातच जणू हे शहर असल्याचे दिसते. शेवटची दंगल झाली ती २००१ मध्ये दसऱ्याच्या दिवशी. दुर्दैवाने धार्मिक विखाराची चूल सदैव पेटती राहिल्याने इथल्या मातीतल्या चांगल्या गोष्टी वारंवार भस्मसात होत राहिल्या. समाजवादी विचारधारेची रुजवात करणारे समाजधुरिण ते हातमाग कामगारापर्यंतचा हरेक घटक होरपळला. त्यामुळे मालेगाववासीयांना दुर्लौकिकचे धनी व्हावे लागले. याला केवळ दैवदुर्विलास म्हणायचे की आपले प्राक्तनच फुटके होते, या विचाराने येथील जनता मनातल्या मनात कुढत असल्याचे जाणवते. आजही ती त्याच अवस्थेत मौन धारण करून आहे. मुंबई उच्च न्यायालयाने २००८ च्या साखळी बॉम्बस्फोटांचा ताजा निकाल देताना चार हिंदू आरोपींची सक्षम पुराव्यांअभावी मुक्तता केली, तरी या शहराने काहीच प्रतिक्रिया नोंदवली नाही, हे विशेष! एरव्ही जणू ज्वालामुखीच्या उद्रेकावर असणाऱ्या या शहरात फट् आवाज आला तरी ते पेटून उठायचे. अर्थात, दोन्ही बॉम्ब स्फोटांनंतर तणावाच्या वातावरणातसुद्धा या शहराने कमालीचा संयम बाळगला, तेव्हा कधीकाळी हजारो मैल दूर असलेल्या ओसामा बिन लादेनवरून पेटणारे हेच का ते मालेगाव, असे म्हणत सारेच आश्चर्यचकीत झाले होते. सुपारीच्या खांडावरूनसुद्धा इथे दंगली उसळल्याचा इतिहास अनेकांना स्मरत असेलच. राजकीय स्टंटबाजी आणि त्यातून उद्भवणाऱ्या संघर्षाचा अक्षरश: वीट आल्याने जनता अलीकडे जरा शहाणी झाली असावी.

८ सप्टेंबर २००६ रोजी पवित्र शब-ए-बारातच्या दिवशी भरदुपारी दीड वाजेच्या सुमारास गजबजलेल्या बडा कब्रस्तान व मुशावरत चौकात एकापाठोपाठ चार स्फोट झाल्याने मालेगाव हादरले होते. या स्फोटांत ३१ निरपराध लोक मारले गेले आणि तीनशेपेक्षा अधिक जखमी झाले. त्यानंतर अवघ्या दोन वर्षांत म्हणजे २९ सप्टेंबर २००८ रोजी पुन्हा स्फोट झाले, जे साखळी स्वरूपाचे होते. गजबजलेल्या वस्तीत एका दुचाकीमध्ये ठेवलेल्या 'आरडीएक्स'च्या स्फोटात आठ जणांचा बळी गेला आणि शंभराहून अधिक नागरिक जखमी झाले होते. पैकी काहींना कायमचे अपंगत्व आले. हे लोक आजही त्या घटनेच्या खाणाखुणा अंगाखाद्यांवर बाळगून न्यायाच्या प्रतीक्षेत आहेत. परंतु, त्याची दखल घ्यायला राजकीय मंडळींना फुरसत नाही. प्रारंभी या स्फोटांचा तपास महाराष्ट्राच्या दहशतवादविरोधी पथकाकडे (एटीएस) होता. 'हिंदू अतिरेकी गटांशी संबंधित व्यक्तींनी हे कृत्य केले असावे,' असा निष्कर्ष काढून 'एटीएस'ने साध्वी प्रज्ञासिंह ठाकूर, लेफ्टनंट कर्नल प्रसाद पुरोहित, निवृत्त मेजर रमेश उपाध्याय आदी सात जणांना अटक केली. देशाच्या राजकारणात गदारोळ माजवणाऱ्या 'भगवा दहशतवाद' या संकल्पनेचा उगमही यादरम्यानच झाला. हे प्रकरण सन २०११ मध्ये राष्ट्रीय तपास यंत्रणेकडे (एनआयए) सोपविण्यात आले. देशात सत्तांतर झाल्यानंतर या तपासाची दिशा बदलल्याचा आरोप झाला आणि 'एटीएस' व 'एनआयए' या यंत्रणांकडून परस्परविरोधी दावे करण्यात येऊ लागले. 'एटीएस'च्या तपासात दोष असल्याचे सांगून 'एनआयए'ने काही जणांचे पुन्हा जबाब घेतले. सतरा वर्षे चाललेल्या या खटल्यात ३७ जणांनी साक्ष फिरवली. काही पोलिसांचाही त्यामध्ये समावेश आहे. विशेष न्यायाधीश ए. के. लाहोटी यांनी निकालात तपासातील त्रुटींवर बोट ठेवले. पुरोहित यांनी काश्मीरमधून 'आरडीएक्स' आणून बॉम्ब तयार केला, याचे पुरावे आढळले नाहीत; तसेच साध्वी ठाकूर यांच्याकडे स्फोट झालेल्या दुचाकीचा ताबा होता, हेही सिद्ध होऊ शकले नाही. सोबतच संबंधित दुचाकीतच बॉम्ब ठेवला होता किंवा आरोपींच्या बैठका झाल्या, हेही सिद्ध करण्यात यंत्रणा अपयशी ठरल्या. अपुरे तांत्रिक पुरावे आणि काही कागदपत्रांमध्ये छेडछाड झाल्याचेही आढळले.

**-- संपत थेटे**

# बदलत्या हवामानाचा सर्वच क्षेत्रांना फटका

बदलत्या हवामानाचा सर्वच क्षेत्रांना फटका बसत आहे. त्यातही कृषी क्षेत्रावर त्याचा जास्तच परिणाम होताना दिसत आहे. सध्या एप्रिल महिना चालू आहे. सर्वत्र कडाक्याचे ऊन जाणवत आहे. सर्वच शहरांचे तापमान ४० अंशाच्या घरात आहे. विदर्भातील काही भागात तर तापमान ४२ ते ४५ अंश सेल्सिअस नोंदवले जात आहे. तापमान वाढल्याने लोकांच्या आरोग्यावर परिणाम होत आहे. कडाक्याच्या उन्हामुळे लोकांना अनेक आजार होत आहेत. या कडाक्याच्या उन्हात लोकांना चक्कर येणे, हृदय विकाराचा झटका येणे, रक्तदाब वाढणे, शरीरातील पाणी कमी होणे, डोळ्यांचे विकार जडणे, लहान मुलांचा घोळणा फुटणे, उष्माघात होणे असे प्रकार घडतात. उष्माघाताने काहींचा जीवही गेला आहे.



तीन वर्षापूर्वी खारघरमध्ये घडलेली घटना अजूनही ताजीच आहे. उष्माघातामुळे महाराष्ट्र भूषण पुरस्कार सोहळ्यात १५ श्री सेवेकरांना जीव गमवावा लागला होता. कडाक्याच्या उन्हात जास्तीतजास्त पाणी पिण्याचा सल्ला डॉक्टरांकडून दिला जात आहे. तसेच फळांचा ज्यूस सेवन करण्यास सांगितले जाते. डॉक्टरांकडून दुपारी ११ ते ४ घराबाहेर न पडण्याचा सल्ला दिला जातो मात्र पोटापाण्यासाठी लोकांना घराबाहेर पडावेच लागते. एकीकडे कडाक्याचे ऊन असताना राज्यातील काही भागात मात्र वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाने हजेरी लावली आहे. पुढील काही दिवस राज्यातीलच नव्हे तर देशातील काही भागात अवकाळी पाऊस पडण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. अवकाळी पावसामुळे शेतीचे प्रचंड नुकसान होते. फळबागा जमीनदोस्त होतात. हातातोंडाशी आलेला घास हिरावला जातो. क्षणात होत्याचे नव्हते होते. वर्षभराच्या मेहनतीवर पाणी पडते. अवकाळी पाऊस झाला की बळीराजाच्या काळजाचा ठोका चुकतो. ऐन उन्हाळ्यात अवकाळी पाऊस पडणे ही गेल्या काही वर्षातील नित्याची बाब झाली आहे. केवळ महाराष्ट्रातच नाही तर देशातील अन्य राज्यातही अवकाळी पावसाचा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे.

देशातील काही भागात मुसळधार पाऊस देखील पडत आहे याचाच अर्थ देशातील एका भागात कडाक्याचे उन तर दुसऱ्या भागात मुसळधार पाऊस अशी विषम परिस्थिती आहे. कडाक्याचे ऊन, अवकाळी पाऊस, गारपीट, चक्रीवादळ या घटना आताच घडतात असे नाही तर वर्षभर घडत असतात. महाराष्ट्र हे सह्याद्रीच्या कुशीत वसले आहे. पूर्वी सर्व ऋतूंचे आगमन वेळेवर होत होते. मागील काही वर्षात ऋतुमानात मोठे बदल पाहायला मिळत आहे. ऋतुमानच बदलले आहे. पूर्वी पाऊस फक्त पावसाळ्यातच पडत असे आता वर्षभर कोठेना कोठे पाऊस पडताना दिसतो. पावसाळ्यात दोन दोन महिने पाऊस पडत नाही.

कधीकधी दोन दिवस इतका पाऊस पडतो की दोन दिवसात दोन महिन्याची सरासरी भरून काढतो. त्यामुळे कोणत्या ऋतूत कोणते पीक घ्यावे याबाबत शेतकरी संभ्रमात असतो. बदलत्या हवामानामुळे काहींनी शेती करणेच बंद केले आहे. राज्यात मागील काही वर्षात मोठ्या प्रमाणात जंगलतोड वाढली आहे. काँक्रीटीकरण वाढले आहे. शहरे सिमेंटचे जंगले बनली आहेत. पर्यावरणाचा ऱ्हास झाला आहे. त्यामुळे वातावरणात बदल होत आहे. वातावरणातील बदलामुळे या घटना घडत आहेत. निसर्गाच्या या बदलत्या चक्राचा मानवजातीवरच नाही तर संपूर्ण जीवसृष्टीवरच परिणाम होत आहे. लोकांनी यातून धडा घेऊन आतापासूनच निसर्ग नियमाने जगणे सुरू करायला हवे. वृक्षतोड थांबवली पाहिजे, जंगलतोड थांबवली पाहिजे. वृक्षलागवड करून ती जगवली पाहिजेत. माणसाने निसर्गावर केलेले आक्रमण थांबवले पाहिजे. जर माणसे निसर्ग नियमाच्या विरुद्ध गेले तर त्याची मोठी किंमत येणाऱ्या पिढीला मोजावी लागेल.

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# डोनाल्ड ट्रम्प यांची बुद्धी भ्रष्ट झाल्यामुळे त्यांनी जगाला नरकात ढकलण्याचे काम केले; त्यामुळे त्यांना दिवसरात्र 'नरक'दिसत असावे.

डोनाल्ड ट्रम्प यांच्या चुकीच्या कार्यशैलीमुळे जगावर आज तिसऱ्या महायुद्धाचे सावट निर्माण झाले आहे.याला कारणीभूत फक्त डोनाल्ड ट्रम्पच आहेत आणि आता इराण युध्दात होत असलेली पीछेहाट पाहुन ट्रम्प तिलमिला झाले असून वाटेल ते वक्तव्य करतांना दिसतात.अमेरिकी रेडिओ निवेदक आणि राजकीय भाष्यकार मायकेल सॅव्हेज यांच्या भारत आणि चीनवर अश्लाघ्य भाषेत टीका करणाऱ्या व्हिडिओची डोनाल्ड ट्रम्प यांनी भलामण केली.अमेरिकेच्या जन्मसिद्ध नागरिकत्वाबाबत भाष्य करताना भारत आणि चीन सारख्या देशांचा 'नरक'असा आक्षेपार्ह उल्लेख यामध्ये केला आहे.ट्रम्प यांनी हा व्हिडिओ रीपोस्ट केल्यावर सर्वत्र टीकेचा सूर उमटला. त्यानंतर त्यांनी सारवासारव करत,भारत हा महान देश असून,त्याचे प्रमुख माझे चांगले मित्र आहोतअसे अधोरेखित केले.अशाच विचलित वक्तव्याच्या कारणास्तव दुसऱ्या फेरीची शांती वार्ता निष्फळ ठरली.कारण शांती वार्तेची चर्चा सुरू असतांना डोनाल्ड ट्रम्प इराणवर फक्त धमक्यांचा वर्षाव करीत आहेत,त्यामुळे दुसऱ्या फेरीची शांती वार्ता फेल झाली आणि पुन्हा युद्धाची दाट शक्यता वाढली आहे.कारण ट्रम्प यांच्या जिभेला हाड नसल्याने अमेरिका-इराण शांती वार्ता शक्य नाही.कारण वारंवार आपले वक्तव्य बदलवुन ट्रम्प इराणची व जगाची दिशाभूल करीत आहे.यामुळेच दुसऱ्यांना 'नरक' म्हणून संबोधणारे डोनाल्ड ट्रम्प यांच्या विषेली वक्तव्यामुळे जगावर महायुद्धाचे काळे ढग निर्माण झाले आणि आता भारत-चीनची तुलना 'नरक'अशी करतात म्हणून त्यांच्या कोणत्याही शब्दावर कोणीही विश्वास ठेवण्यास तयार नाही त्याचा परिणाम म्हणून युद्ध पुन्हा भडकु शकते. दिनांक २८ फेब्रुवारीला अमेरिकेने इराणवर अचानक हल्ला करून जगाला महायुध्दाच्या खाईत लोटुन जगाला आर्थिक आणि मानवीय अडचणीत टाकले व जगाला सामंजस्यमध्ये आणले आणि आता शांती वार्ता सुरू असतांना सुध्दा वेळोवेळी इराणला धमकी देण्याचे काम करीत आहेत.त्यामुळे एकाच वेळेस दोन गोष्टी होवू शकत नाही.एकतर शांती वार्ता किंवा युद्ध हाच पर्याय आहे. अशा परिस्थितीत इराण शांतीवार्ताच्या दुसऱ्या फेरीतून बाहेर पडला आहे.यामुळे इराण-अमेरिका -इजरायल युद्ध केंव्हाही कधीही भडकू शकते याला नाकारता येत नाही. या युध्दाची मुख्य जड डोनाल्ड ट्रम्प आहे.कारण डोनाल्ड ट्रम्प मिडिया समोर येऊन केव्हा काय बोलतील याचा कोणालाच भरोसा रहाला नाही.आज अमेरिकन जनतेसह संपूर्ण जग डोनाल्ड ट्रम्पला विश्व शांतीचा हत्यारा समजत आहे.अमेरिकेने नेहमीच अनेक देशांना रक्ताच्या लाथोळ्यात सोडून पळ काढला ही बाब जगातील अनेक देशांना चांगल्याप्रकारे ग्यात आहे आणि त्याचीच पुनरावृत्ती पश्चिम आशियातील ( मिडलिस्ट) देशांची करून ठेवली आहे. त्याचप्रमाणे डोनाल्ड ट्रम्प आपली करारी हार लक्षात घेता, मिडलिस्टला रक्ताच्या लाथोळ्यात सोडून पसार होण्याच्या तयारीत होते.परंतु त्यांना तोंड लपवायला जागा नसल्याने पुन्हा युद्धाच्या तयारी लागले आहेत. आज जे पश्चिम आशियात भितीचे वातावरण आणि मृत्यू तांडव निर्माण झाले आहे याला कारणीभूत फक्त डोनाल्ड ट्रम्पच आहे असे मला वाटते.कारण त्यांच्या छोट्याशा चुकीच्या निर्णयामुळे व वक्तव्यामुळे परिस्थिती दिवसेंदिवस चिघळत गेली आणि याचे रूपांतर युद्धात झाले.यावरून स्पष्ट होते की, डोनाल्ड ट्रम्प यांचे मानसिक संतुलन ढासळले असुन त्यांच्यावर कोणीही विश्वास ठेवण्यास तयार नाही. इराण- अमेरिका-इजरायल यांच्या युद्धापासुन,नाटो देश, भारत, चीन, रशिया दुरू असतांना सुध्दा अमेरिकेने नाटो देशांना खडे बोल सुनावले आणि आता डोनाल्ड ट्रम्प भारत-चीनला (हेलहोल) नरक म्हणून संबोधतात ही तर भारताच्या बाबतीत डोनाल्ड ट्रम्प यांनी संपूर्ण हद पार केल्याचे लक्षणच म्हणावे लागेल. त्यामुळे डोनाल्ड ट्रम्प यांच्या वागण्यावरून व बोलण्यावरून स्पष्ट होते की,त्यांचे मानसिक संतुलन ढासळले आहेत यामुळे त्यांच्या जीभेला हाड रहाले नाही.डोनाल्ड ट्रम्प आधी भारताला नरक म्हणून संबोधतात आणि आता सारवासारव करून भारताला महान देश म्हणून उल्लेख करतात यावरून स्पष्ट होते की गेल्या ५७ दिवसात त्यांनी जगाला विचलित करणारे वक्तव्य केले असून हे सर्व मुर्खपणाचे लक्षण आहे.एकीकडे अमेरिका शांतीवार्ताची पहल करीत आहे तर दुसरीकडे अमेरिकेने संपूर्ण पश्चिम आशियात आपले सैन्य जाळे विणुन इराणची नाकाबंदी करण्यास सुरुवात केली आहे.पश्चिम आशियात आपली सैन्य ताकद मजबूत करण्यासाठी तिसरी अण्वस्त्रसज्ज विमानवाहू नौका यूएसएस जॉर्ज एचडब्ल्यू बुश(सीव्हीएन-७७) आता इराणच्या उंबरठ्यावर पोहोचली आहे.लाल समुद्रातील धोकादायक मार्ग टाळून ही युद्धनौका आफ्रिकेचे दक्षिण टोक म्हणजेच केप ऑफ गुड होपला वळसा घालून पश्चिम आशियात तैनात केली आहे.हे अमेरिकन नौदलाचे निमित्झ क्लासमधील १० वे आणि शेवटचे सुपर कॅरियर आहे.यावरून स्पष्ट होते की,एकिकडे सैन्य तैनाती आणि दुसरीकडे शांती वार्ता या दोन्हीही गोष्टी एकाच वेळी शक्य नाही.त्यामुळे डोनाल्ड ट्रम्प यांचे तत्व जगाला पटणारे दिसत नाही.आज जगात ज्या सामुद्रधुनी मधुन २५ टक्के तेल वाहू जहाजांचे आवागमन होते तीथे निर्माण झालेल्या कोंडीचा सुत्रधार डोनाल्ड ट्रम्पच आहे.त्यमुळे आज अनेक देशांचे हजारो जहाज होर्मुझच्या आसपास अडकले आहेत. ट्रम्पने जर युद्ध छेडले नसते तर आज होर्मुझ सर्वांसाठी खुला रहाला असता.परंतु अमेरिकेच्या अरेरावीमुळे इराणने होर्मुझवर आपली पकड मजबूत केली आहे आणि त्याचा परिणाम आज जगातील अनेक देशांना भोगावा लागतो आहे आणि याला जबाबदार फक्त डोनाल्ड ट्रम्पच आहेत. अनिश्चित काळासाठी युद्ध विराम झाला आहे आणि शांती वार्ता बंद -सुरू अशा व्दीधा परिस्थितीत आहे, तरी ट्रम्प यांचा धमक्यांचा वर्षाव थांबलेला नाही.ट्रम्प यांनी नौदलाला आदेश दिला आहे की, होर्मुझच्या सामुद्रधुनीमध्ये अडथळा निर्माण करणाऱ्या इराणच्या छोट्या नौका दिसताच त्याला गोळ्या घालून नष्ट करा असा आदेश अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी आपल्या नौदलाला दिला आहे. अशाप्रकारे ट्रम्प या युध्दाला चिघळविण्याचे काम करीत आहेत. कारण अमेरिकेने जर युध्दाला सुरुवात केली तर, त्याला प्रत्युत्तर देण्यासाठी इराण सज्ज आहे असे इराणच्या सुत्रांनी सांगितले.जय हिंद.

**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**( स्वतंत्र पत्रकार )**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

## पक्ष अखवा

एकदोन नेते कशास
पक्ष फोडावा अखखा
शल्यचिकित्सा अशी
किल्लया देऊ धक्का

बाहेर पडावे हळूवार
इजा न होताही नखा
आपल्या सोबत हवा
पक्ष फोड्याही सखा

संपूर्ण ऑपरेशनमधे
परिपूर्ण गुप्तताराखा
गडबड्यापहारेक-या
जागीचं जेरबंद रोखा

अंधविश्वास नको तो
कुणीही देणार धोका
अभ्यास पूर्ण हल्लया
क्वचित सुवर्ण मोका

विकत घ्यायचे पहारे
लालचंपरिसरा फेका
असा हव्यासी चटका
गोडवा पडावा फिका

तड जोड मुळी नाही
वाढवून द्यावा टक्का
इमानधरमकरम सर्व
काळ्यां जिव्हे विका

**- हेमंत मुसरीफ, पुणे.**
**९७३०३०६९९६**

# जिंतूर पोलिसांची कारवाई; सायबर सेलच्या मदतीने चोरट्यास अटक, मुद्देमाल जप्त

**अक्षराज : रहीम कोक्कर**

**दि.२६, जिंतूर (परभणी) :** सायबर सेलच्या तांत्रिक मदतीने जिंतूर पोलिसांनी मोटरसायकल चोरी प्रकरणाचा यशस्वी तपास करत आरोपीला अटक केली असून चोरीस गेलेला मुद्देमाल जप्त केला आहे याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, विलास जनार्दन पवार (वय ३७, रा. डांबरी पोस्ट चितळी पुतळी, ता. जि. जालना) यांनी दि. ०७ जुलै २०२५ रोजी जिंतूर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती. ि

द. ०४ जुलै २०२५ रोजी परभणीहून डांबरीकडे जात असताना जिंतूरजवळ मैनापुरी पाटीजवळ एका अनोळखी इसमाने हात दाखवून लिफ्ट मागितली. त्यास जिंतूरपर्यंत सोडल्यावर त्या इसमाने दारू पिण्याचा बहाणा करून फिर्यादीला दुकानात पाठवले. याच दरम्यान आरोपीने मोटरसायकल (क्र. चक २१ उए ९२७५, होंडा शाईन) तसेच त्यामध्ये ठेवलेला




रेडमी कंपनीचा मोबाईल असा सुमारे १ लाख १० हजार रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला.या प्रकरणी जिंतूर पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ३७२/२०२५, कलम ३०३ बीएनएस अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

पोलीस निरीक्षक गजेंद्र सरोदे यांच्या मार्गदर्शनाखाली हेड कॉन्स्टेबल दीपक वाटोडे, पोह सुनील राठोड यांनी तपास सुरू केला. तसेच सायबर सेलचे हेड कॉन्स्टेबल गणेश कोटकर व पोह स्वप्निल पोतदार यांनी सीडीआरच्या तांत्रिक विश्लेषणातून आरोपीचा शोध लावला.त्यानुसार गजानन सुभाष जाधव (वय २६, रा. जांब अंध, ता. सेनगाव, जि. हिंगोली) यास अटक करण्यात आली. त्याच्याकडून चोरीस गेलेली होंडा शाईन मोटरसायकल (किंमत अंदाजे १ लाख रुपये) जप्त करण्यात आली आहे.या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक गजेंद्र सरोदे यांच्या मार्गदर्शनाखाली हेड कॉन्स्टेबल दीपक वाटोडे करीत आहेत.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# टाकळी ढोकेश्वर परिसरात ४० च्या पाऱ्यात कांदा काढणी सुरू !

## मजूर टंचाई,घसरलेले दर; वाढलेल्या खर्चामुळे शेतकरी हवालदिल



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२६, पारनेर (अहिल्यानगर) :** पारनेर तालुक्यात रब्बी हंगामातील कांदा काढणीच्या कामांनी वेग घेतला आहे. टाकळी ढोकेश्वर, वडगाव सावताळ, वासुंदे ढवळपुरी, परिसरात सर्व शेतकऱ्यांची उन्हाळी कांदा काढणीची कामे एकाच वेळी आल्याने मजुरांची तीव्र टंचाई जाणवत आहे. यंदाचा हंगाम शेतकऱ्यांसाठी आनंदाचा ठरण्याऐवजी चिंतेचा ठरत आहे.

सध्या कमाल तापमानाचा पारा ४० अंशांवर गेल्याने अंगाची लाही लाही होत आहे. अशा परिस्थितीत शेतकरी कांदा काढणीच्या कामात व्यस्त आहेत. त्यातच बाजारात कांद्याला अपेक्षित भाव मिळत नसल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे. माळशेज घाटा व मध्यप्रदेश तसेच विविध राज्यांमधून कामाच्या शोधात आलेले परप्रांतीय मजूर शेतकऱ्यांना कांदे काढणीच्या कामाला हातभार लावत आहेत.

एक एकर कांदे काढणीसाठी मजुरी पोटी सध्या १५ ते १६ हजार रुपये शेतकऱ्याला मोजावे लागतात. पावसाच्या तडाख्यातून शेतमालाला वाचवण्यासाठी प्रत्येक शेतकऱ्याची लगबग सुरू आहे. तालुक्यातील ढवळपुरी, धोत्रे ढोकी, आळकुटी परिसरात कांदा लागवड मोठ्या प्रम ाणात झाली होती. पीक पण चांगले आले. मात्र अवकाळी पावसाने कांदा व इतर शेती पिकांचे अतोनात नुकसान केले. सध्या शेतकरी कांदा काढणी व कांदा चाळीत भरण्याची कामे सुरू आहेत. एकाचवेळी सर्वत्र कडाक्याच्या उन्हात स्थानिक मजुरांची वानवा असताना बाहेरून आलेल्या व उपलब्ध मजूरांचे दरही वाढल्याने उत्पादन खर्चात वाढ झाली आहे. पूर्वीच्या तुलनेत यंदा एकरी काढणीचे दर आवाक्याबाहेर गेले आहेत. खते, औषधे आणि लागवडीचा खर्च आधीच वाढलेला असताना, आता काढणीसाठी होणारा अतिरिक्त खर्च शेतकऱ्यांचे कंबरडे म ोडणारा ठरत आहे.

मजुरांच्या तीव्र टंचाईमुळे अनेक ठिकाणी विचित्र पण कौतुकास्पद चित्र पाहायला मिळत आहे. मजुरांची वाट बघून थकलेले शेतकरी आता स्वतः च्या कुटुंबासह शेतात उतरले आहेत. अबालवृद्ध, महिला आणि अगदी शालेय मुलेही कांदा काढणी आणि गोणी भरण्याच्या कामात मदत करताना दिसत आहेत. मजूर मिळेना म्हणून घरचीच माणसं कामाला लागली अशी परिस्थिती सध्या टाकळी ढोकेश्वरच्या शिवारात पहायला मिळत आहे.

**शेतकरी दुहेरी संकटात...**

कांदा हा असा घटक आहे जो कधी ग्राहकांच्या डोळ्यात पाणी आणतो, तर कधी उत्पादकांच्या टाकळी ढोकेश्वर - ढवळपुरी पट्ट्यातील शेतकरी सध्या दुहेरी संकटात आहेत. एकीकडे मजुरांची टंचाई आणि दुसरीकडे बाजारभावाची अनिश्चितता जर सरकारने याकडे लक्ष दिले नाही किंवा मजुरांच्या उपलब्धतेसाठी काही यंत्रणा उभी राहिली नाही तर कांदा उत्पादक शेतकरी मोठ्या आर्थिक गर्तेत सापडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**- संदिप नाईकवाडी, कांदा उत्पादक शेतकरी, टाकळी ढोकेश्वर**
**- गणेश रंगनाथ चौधरी, प्रगतशील शेतकरी, ढवळपुरी**

# सरपंचानं जिवंतपणीच केला स्वतः चा दहावा; सौंदाळाचे सरपंच आरगडे यांचे इच्छापत्र

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२६, अहिल्यानगर :** जिल्ह्यातील नेवासा तालुक्यातील सौंदाळा गाव हे नेहमीच चर्चेत असते. विविध निर्णयातून सौंदाळा गाव हे पारंपरिक जमजुतींना थेट आव्हान देत समाजाला विचार करायला भाग पाडते. याच गावच्या ग्रामपंचायतीचे सरपंच शरद बाबुराव आरगडे यांनी मृत्यूनंतर पार पडणारी दशक्रिया विधी जिवंतपणीच करून घेतली. एवढेच नव्हे तर कार्यक्रमात स्वतः चेच व त्यांच्या पत्नी आणि मुलाने शास्त्रोक्त पद्धतीने विधी करत जिवंतपणीच पिंडदान करून त्यांनी समाजातील अनिष्ट रूढी विरोधात ठाम भूमिका घेत, स्वतः चे इच्छापत्र तयार केले आहे. त्यांनी केवळ जिवंतपणी स्वतः चा दहावा घालून समाजाचे लक्ष वेधले नाही, तर १०० रुपयांच्या स्टॅम्प पेपरवर कायदेशीर प्रतिज्ञापत्र तयार करून, विधवा स्त्रियांना दिल्या जाणाऱ्या दुय्यम वागणुकीवर प्रहार केला आहे.

या प्रतिज्ञापत्रात त्यांनी स्पष्ट नमूद केले आहे की, माझ्या निधनानंतर माझ्या पत्नीने कोणत्याही विधवा प्रथा पाळू नयेत. तिने कुंकू पुसू नये, बांगड्या फोडू नयेत किंवा मंगळसूत्र उतरवू नये. श्रीमती प्रियंका शरद आरगडे या माझ्या पत्नी असून, समाजात प्रचलित असलेल्या विधवा प्रथा, जसे की कुंकू पुसणे, बांगड्या फोडणे, मंगळसूत्र काढणे, पांढरे वस्त्र परिधान करण्याची सक्ती तसेच धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांपासून दूर ठेवणे या अत्यंत अमानवीय असून स्त्रियांच्या सन्मानाला बाधा आणणाऱ्या आहेत. माझ्या मृत्यूनंतर माझ्या पत्नीवर कोणतीही अशी प्रथा लादली जाऊ नये. तिला विधवा स्त्रीप्रम ाणेच कुंकू-टिकली लावणे, बांगड्या व दागिने परिधान करणे, कोणत्याही रंगाचे वस्त्र परिधान करणे आणि सर्व सण-सम ारंभ, धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांमध्ये आनंदाने सहभागी होण्याचा पूर्ण अधिकार आहे. माझ्या कुटुंबियांनी, नातेवाईकांनी




किंवा समाजाने तिला यापासून रोखू नये, तिच्याशी कोणत्याही प्रकारची जबरदस्ती किंवा अपमानास्पद वागणूक दिली जाऊ नये, अशी स्पष्ट भूमिका त्यांनी मांडली.

आरगडे यांनी त्यांच्या इच्छापत्रात मृत्यूनंतरच्या धार्मिक विधींविषयीही आपली भूमिका स्पष्ट केली आहे. दहावा, तेरावा किंवा श्राद्ध या रूढींवर विश्वास नाही. मृत्यूनंतर आत्म्याच्या शांतीसाठी विधी नव्हे, तर जिवंतपणी केलेली चांगली कर्मे महत्त्वाची असतात,असे त्यांनी नमूद केले आहे. या प्रतिज्ञापत्रावर सचिन अशोक आरगडे व गणेश अरुण आरगडे यांनी साक्षीदार म्हणून स्वाक्षऱ्या केल्या आहेत. विशेष म्हणजे, हे इच्छापत्र त्यांनी जाहीर कार्यक्रमात ध्वनीक्षेपकावर स्वतः वाचून दाखवले, ज्यामुळे समाजात या विषयावर चर्चा सुरू झाली आहे.

# महसूल विभागाचे जुने कायदे बदलून प्रशासन लोकाभिमुख करणार - महसूलमंत्री बावनकुळे

**अक्षराज : प्रमोद डफळ**

**दि.२६, शिर्डी (अहिल्यानगर) :** राज्याचे महसूल खाते हे नागरिकांच्या मालमत्तेचे रक्षण करते. त्यामुळे जुन्या महसूल कायद्यांमधील क्लिष्ट प्रक्रिया कमी करून सर्वसामान्यांना जलद न्याय देण्यासाठी कायदे बदलण्यात येत आहेत, असे प्रतिपादन महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले. नागरिकांच्या समस्या ऐकून त्यांची थेट सोडवणूक करण्यासाठी शिर्डी अपर जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित जनता दरबारात ते बोलत होते.

यावेळी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, अपर जिल्हाधिकारी बाळासाहेब कोळेकर, शैलेश हिंगे, अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे, निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते, शिर्डी उपविभागीय अधिकारी माणिक आहेर, माजी आमदार स्नेहलता कोल्हे आदी उपस्थित होते.महसूलमंत्री श्री. बावनकुळे म्हणाले, शेतीच्या रस्त्यांचे वाद मिटवण्यासाठी पुढील पाच वर्षांत सर्व पाणंद रस्ते बारमाही केले जातील व त्यांच्या कडेला वृक्षलागवड केली जाईल. सातबारा उताऱ्यावरील मृत व्यक्तींचे नाव कमी करण्यासाठी नागरिकांना हेलपाटे मारावे लागू नयेत, यासाठी तहसीलदारांनी स्वतःहून ही दुरुस्ती करावी. जमिनीच्या मोजणीसाठी लागणारा वेळ कमी करण्यासाठी खासगी




मोजणीदार नेमून ड्रोनच्या साहाय्याने केवळ पंधरा दिवसांत मोजणी पूर्ण करण्याचे उद्दिष्ट असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.गोरगरिबांना हक्काचे घर मिळावे यासाठी शासनाने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. यानुसार २०११ पूर्वी गायरान व सरकारी जागेवर बांधलेली निवासी घरे नियमित केली जाणार आहेत. या निर्णयामुळे भटके विमुक्त, पारधी समाजासह अनेक गरिबांना मोठा आधार मिळेल. केवळ एक हजार रुपये शुल्क आकारून ग्रामपंचायतीच्या दप्तरात या घरांची नोंदणी करून मालकी हक्क दिला जाईल, असेही श्री. बावनकुळे यांनी सांगितले.

महसूल विभागातील प्रलंबित प्रकरणांबाबत त्यांनी अधिकाऱ्यांना सूचना दिल्या. अधिकाऱ्यांनी त्यांच्याच स्तरावर नागरिकांचे प्रश्न सोडवले तर लोकांना मंत्रालयात येण्याची वेळ येणार नाही. महसुली प्रकरणांच्या सुनावणीत तारखांवर तारखा न देता केवळ दोन तारखांमध्ये निर्णय घेण्याचे आदेश त्यांनी दिले आहेत. दुसऱ्या तारखेला लेखी युक्तिवाद न आल्यास एकतर्फी आदेश काढले जातील, असे त्यांनी सांगितले. नागरिकांची कामे वेळेत व्हावीत यासाठी प्रशासन कटिबद्ध आहे. अधिकाऱ्यांकडे जाऊनही काम पूर्ण न झाल्यास नागरिकांनी माझ्या व्हॉट्सअ‍ॅप क्रमांकावर स्वतः चे नाव व कामाचा तपशील पाठवावा, असे आवाहन त्यांनी केले.जिल्हाधिकारी डॉ. आशिया म्हणाले, नागरिकांचे सर्व प्रश्न सोडवण्यासाठी जिल्हा प्रशासन कटिबद्ध आहे. अकृषिक परवानगी, वाळू धोरण, शेतरस्ते व तुकडेबंदी कायद्याबाबत शासनाने घेतलेल्या लोकोपयोगी निर्णयांची प्रभावी अंम लबजावणी जिल्ह्यात केली जात आहे. राज्याच्या व देशाच्या आर्थिक प्रगतीत महसूल तसेच भूमी अभिलेख विभागाचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे, असेही जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले.

वर्ष २०४७ पर्यंत देशाला 'विकसित राष्ट्र' बनवण्याच्या ध्येयपूर्तीसाठी शासकीय यंत्रणा काम करत आहे. या संकल्पासाठी गाव पातळीवरील कोतवाल, तलाठी ते वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत सर्वजण प्रयत्नशील आहेत. नागरिकांच्या अडीअडचणी शक्यतो जिल्हा पातळीवरच सोडवल्या जातील व आवश्यकतेनुसार कायद्यात किंवा शासन निर्णयात बदल करण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा केला जाईल, असेही त्यांनी सांगितले.

प्रास्ताविकात श्री. कोळेकर यांनी महसूल विभागाची अकृषिक परवानगी कायद्यातून रद्द करणे, घरांसाठीची तुकडे खरेदी विना-नजराणा नियमानुकूल करणे, ५०० रुपयांच्या स्टॅम्पवर कौटुंबिक वाटपपत्राची नोंदणी करणे, सातबारा उताऱ्यावरील कालबाह्य नोंदी वगळणे व 'बळीराजा शेत पाणंद योजने'तून कृषी विकासाला चालना देणारे धोरण या ऐतिहासिक निर्णयांबद्दल माहिती दिली. यावेळी महसूलमंत्र्यांनी दोनशेहून अधिक नागरिकांची निवेदने प्रत्यक्ष स्वीकारली. यातील काही निवेदनांवर जागेवरच निर्णय दिला, तर काही निवेदनांचा पंधरा दिवसांच्या आत निपटारा करण्याची ग्वाही दिली. याप्रसंगी महसूलमंत्र्यांच्या हस्ते महसुली सेवांचा लाभ घेतलेल्या लाभार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले.

# थोडक्यात

## तुमची निघाली वाळू पण, आमच्या करपलेल्या पिकांचं काय...?



**अक्षराज : शिवराज मुगळे**

**दि.२६, सोलापूर :** भीमा नदीला उजनी जलाशयातून पाणी सुटायला तब्बल एक महिन्याचा उशीर का झाला? याबाबत बरेच प्रशासकीय तर्क वितर्क लढवले जात असताना एक बाब मात्र प्रकर्षाने समोर येत आहे आणि ती म्हणजे भीमा नदीवर मंगळवेढा आणि दक्षिण सोलापूर तालुक्याच्या हद्दीत सुरू असलेले वाळूचे ठेके. भीमा नदीला पाणी आले की नदीपात्रातून वाळू काढता येत नाही. त्यामुळेच विविध कारणे पुढे करत हे पाणी लांबवले गेले की काय ? अशी शंका आता शेतकऱ्यांना येत आहे.उजनी धरणात पुरेसा पाणीसाठा असताना अल निनो' च्या शक्यतेने हवामानाच्या कारणाचे निमित्त पुढे करत पाणी उशिरा सोडले गेले. पाणी साठ्याचे शिस्तबद्ध नियोजन व्हायलाच हवे ही बाब शासनमान्य आणि सर्वमान्य असायलाच हवी. मात्र जर केवळलावणारी आहे.

भीमेत पाणी उशिरा सोडले जावे जेणेकरून भीमा नदीतील वाळूचा बिनबोभाट उपसा करता वाळूच्या ठेक्याच्या कारणामुळे पाणी उशिरा सोडले जात असेल तर ही बाबनिश्चितपणे जिल्ह्याच्याप्रशासनाला विचार करायल ायेईल, असा कयास बहुदा हाय प्रोफाईल राजकीय वाळू ठेकेदारांचा असावाच. नदीला पाणी आले की वाळूचा उपसा आणि वाहतूक नदीपात्रातून करता येत नाही. याशिवाय वाळूच्या यंत्राद्वारे उपशाला ही राष्ट्रीय हरित लवादाचे निर्बंध आहेत, त्यामुळे भीमा नदीत उजनीतून पाणी सुटायला वेळ लागला की काय? असा तर्क शेतकरी बांधवातून काढला जात आहे. त्यामुळे वाळूचे ठेके आणि भीमा नदीत पाणी सुटायला झालेला उशीर याबाबतच्या विविध कारणांची चौकशी राज्य शासनाने करावी, अशी मागणी शेतकरी बांधवातून केली जात आहे.वास्तविक पाहता वाळूचा उपसा होत राहील. त्यामधून अनेक राजकीय आणि खाजगी लोकांचे उखळ पांढरे होत राहील. मात्र भीमा नदीला उशिरा पाणी सोडल्यामुळे होरपळलेली पिके आणि शेतकऱ्यांच्या डोळ्यात जमा झालेली आसवे यांचा हिशोब कुठेतरी पांडुरंग नक्की करणार यात मात्र शंका नाही.

## 'मुंबई-बंगळुरू वंदे भारत स्लीपर'चा मुहूर्त ठरला



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२६, मुंबई :** मुंबई ते बंगळुरू प्रवास आता सोपा होणार आहे. दोन्ही शहरांदरम्यान वंदे भारत स्लीपर ट्रेनला सुरूवात होणार आहे. यंदा ऑगस्ट महिन्यातच या वंदे भारत स्लीपर ट्रेनचा शुभारंभ होणार असल्याची माहिती रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिली आहे. केएसआर बंगळुरू ते छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई या स्थानकांदरम्यान हे सेवा सुरू होणार आहे. यामुळे मुंबईकरांना मोठा दिलासा मिळणार आहे.

**२४ तासांचा प्रवास १५ तासांत**

अनेक वर्षांपासूनमुंबई ते बंगळुरू प्रवासासाठीकेवळ उद्यान एक्सप्रेसचा पर्याय उपलब्ध होता. या ट्रेनने बंगळुरूपर्यंत पोहोचायला २४ तासांपेक्षा जास्त वेळ लागतो. पण वंदे भारतमुळे हा वेळ फक्त १५ तासांवर येणार आहे. रात्री उशीरा ही ट्रेन स्थानकावरून रवाना होईल आणि दुसऱ्या दिवशी पहाटेपर्यंत दाखल होईल. त्यामुळे एका रात्रीत मुंबई ते बंगळुरू प्रवास शक्य होणार आहे. सोलापूर आणि कालाबुर्गी मार्गे ही ट्रेन धावणार आहे.यावेळी बोलतना रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी देशातल्या पहिल्यावंदे भारत स्लीपर ट्रेनच्यायशाबद्दल सांगितलं. कोलकाता मधील हावडा ते गुवाहटीमधील कामाख्यादरम्यान ही ट्रेन सुरू झाली होती. या स्लीपर ट्रेनला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असल्याचे त्यांनी सांगितले. या ट्रेनमुळे प्रवास वेगवान आमि आराम दायी झाला आहे. या नंतर वंदे भारत स्लीपर ट्रेनची सुरूवात जुलै ते ऑगस्टदरम्यान होण्याची शक्यता आहे.

## जिल्हा वार्षिक योजना २०२६-२७ बैठक; जिल्ह्याच्या नियोजनाकडून पालकमंत्र्यांचा आढावा

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२५, चंद्रपूर :** सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात जिल्ह्याच्या विकासासाठी मंजूर नियतव्यय, विविध यंत्रणाच्या माध्यमातून करण्यात येणारी विकासकामे, त्याची अंमलबजावणी आदीबाबत राज्याचे आदिवासी विकास मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. अशोक उईके यांनी जिल्हा वार्षिक योजनेचा आढावा घेतला. नियोजन भवन येथे आयोजित या बैठकीला आ. देवराव भोंगळे, आ. करण देवतळे, जिल्हाधिकारी वसूमना पंत, मुख्य कार्यकारी अधिकारी पुलकित सिंह, मनपा आयुक्त अकुनुरी नरेश, उपवनसंरक्षक कुमारस्वामी, कुशाग्र पाठक, योगेश वाघाये, आनंद रेड्डी, प्रभारी जिल्हा नियोजन अधिकारी सुभाष कुंभरे यांच्यासह विविध यंत्रणेचे अधिकारी उपस्थित होते. यावेळी पालकमंत्री डॉ. उईके म्हणाले, एप्रिल ते जून २०२६ या कालावधीत यंत्रणांनी नियोजन विभागाकडे प्रस्ताव सादर करावे. या प्रस्तावात आपल्या विभागामार्फत चालू आर्थिक वर्षात कोणकोणती विकास कामे करण्यात येणार आहे, त्याची प्रभावी अंमलबजावणी कशी करणार, या बाबींचा समावेश असावा. तसेच विविध यंत्रणांनी जिल्ह्यात नाविण्यपूर्ण उपक्रम राबवावे.

महावितरणने तेलंगणा आणि महाराष्ट्राच्या सीमेवरील गावे १०० टक्के सौर उर्जेवर करावी. कर्ज वितरणाबाबत बँकांची तक्रार येणार नाही. तसेच शेतकऱ्यांना वेळेवर बँकांनी कर्ज उपलब्ध करून द्यावे, यासाठी जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापकांनी योग्य नियोजन करावे. आकांक्षित तालुका जीवतीम ध्ये शिक्षण, आरोग्य या बाबींवर विशेष फोकस करावा. क्रीडा विभाग खेळाडू तसेच तरुणांना खेळण्यासाठी दीर्घकाळ टिकेल, अशी कामे घ्यावीत. वैद्यकीय रुग्णालयातील सर्व उपकरणे अद्यावत ठेवावी. प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रात पावसाळ्याच्या दिवसात आवश्यक औषधी उपलब्ध ठेवाव्या. तसेच शुद्ध पिण्याचे पाणी, बसण्याची व्यवस्था, शौचालय स्वच्छ ठेवावे. अंगणवाड्यांमध्ये सुद्धा पिण्याचे पाणी व शौचालयाची व्यवस्था असावी. ज्या गावांना रस्त्यांची अत्यंत गरज आहे, अशा गावांसाठी ग्रामीण रस्ते त्वरित करावे. त्यासाठी निधी देण्यात येईल. चंद्रपूर महानगरपालिकेने शहरात चांगल्या अभ्यासिका तयार कराव्या, अशा सूचना पालकमंत्री डॉ. अशोक उईके यांनी दिल्या.